दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ८९ वा शुक्रवार दि.०६ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# आमचे सरकार आल्यास लाडकी बहीण योजनेत २ हजार रुपये देणार

सांगली : महायुती सरकारे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केल्यापासून या योजनेची चर्चा राज्यभर सुरू आहे. विरोधक महाविकास आघाडीचे नेते या योजनेवरून महायुती सरकारवर टीकास्त्र सोडत आहेत. लाडकी बहीण योजनेची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत वाढवली असून यामुळे लाखो महिलांना दिलासा मिळाल्याचे म्हटले जात आहे. यातच काँग्रेस खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी महाराष्ट्र दौ-यावर होते. यावेळी सांगली येथे झालेल्या सभेत आमचे सरकार आल्यास लाडकी बहीण योजनेचे पैसे २ हजार रुपये करू, असे आश्वासन काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिले.

शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हात लावला तो पडला, राम मंदिराला हात लावला ते गळत आहे, गुजरातच्या पुलाचे उद्घाटन केले तर तो पुल पडला, मोदी येत आहेत, म्हणून पुतळा लवकर बनवा आणि तो बनवला आणि पडला, अशी टीका खरगे यांनी पंतप्रधान मोदींवर केली. आरएसएसवाले बनवतात ते पडत आहे.



शाळेतील अभ्यासक्रम बदलत आहेत. संविधान बदलत आहेत. आणखी २० जागा मिळाल्या असत्या तर मोदी सरकार दिसले नसते, असा मोठा दावा खरगे यांनी यावेळी केला आहे.

खरी शिवसेना आमच्यासोबत आहे, खरी राष्ट्रवादी शरद पवार यांच्यासोबत आहे, त्यांच्या बाजूने सर्व नकली आहेत. आमचे सरकार आल्यास लाडकी बहीण योजनेसाठी तुम्हाला २ हजार रुपये देणार, तुम्ही तुमचा सन्मान मोदी यांच्यासमोर गहाण ठेवणार आहात का, मोदी सरकारने तोडण्या-फोडण्याच्या पलीकडे काय केल ते सांगा, महाराष्ट्र जर जिंकला तर सारा देश जिंकेल आणि लवकरच भाजपाचे सरकार जाईल, या शब्दांत खरगे यांनी हल्लाबोल केला.

दरम्यान, मल्लिकार्जुन खरगे हे सांगलीत दिवंगत नेते पतंगराव कदम यांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमासाठी आले होते. लोकसभा निवडणुकीत नरेंद्र मोदी हे १ लाख ७० हजार मतांनी जिंकले आहेत. मात्र, विश्वजित कदम हे एका विधानसभेत १ लाख ४० हजार मतांनी जिंकले, असे सांगत नरेंद्र मोदी यांना टोला लगावला.

## श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातील रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत - माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्याकडून महापालिका आयुक्तांना सूचना

लातूर प्रतिनिधी : गुरूवार दि. ४ सप्टेंबर २४ श्री गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातील रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवण्यात यावेत, मिरवणूक मार्गावरील अडथळे दूर करावेत, रस्त्यावर आलेल्या झाडाचा फांद्या बाजूला हटवाव्यात आदी सूचना माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख यांनी लातूर महापालिकेचे आयुक्त यांना पत्र पाठवून केल्या आहेत. लातूर महापालिकेचे आयुक्त श्री मनोहरे यांना पाठवलेल्या पत्रात आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे की, सततच्या पावसामुळे शहरात रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत, पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईनचे खोदकाम आणि इतर कामामुळेही रस्ते खराब होऊन जागोजागी चिखल निर्माण झाला आहे. श्री गणेशोत्सवाच्या दरम्यान मिरवणुकांना या खड्ड्यामुळे अडचणी



निर्माण होण्याची शक्यता आहे, अनेक ठिकाणी मिरवणूक मार्गात झाडाच्या फांद्याही रस्त्यावर आल्या आहेत, आता पावसाने थोडी विश्रांती घेतली आहे त्यामुळे महापालिकेने रस्ते दुरुस्ती, खड्डे बुजवण्याचे काम तातडीने हाती घेणे आवश्यक आहे, आवश्यक त्या ठिकाणी रस्त्यावर आलेल्या झाडाच्या फांद्या हटवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा कामाला लावावी, तहसील कार्यालयानजीक तसेच इतर काही ठिकाणी रस्त्याच्या डिव्हायडर मध्ये स्टील रॉड बसून युटर्न बंद केले आहेत, मिरवणुकीच्या दिवशी फक्त एक दिवसासाठी आवश्यकतेनुसार हे स्टील रॉड काढून घ्यावेत, असेही देशमुख यांनी या पत्रात म्हटले आहे, महापालिका प्रशासन युद्ध पातळीवर हे काम हाती घेईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उदगीर येथील हेलिपॅड वर आगमन होताच त्यांच्यासोबत सुनीलकुमार हणमंतराव देशमुख स्थापत्य अभियंता विलास शुगर युनिट २ तोंडार उदगीर

## न्यायालयाच्या आदेशानुसार मंडप तपासणीसाठी पथकांची स्थापना

लातूर/प्रतिनिधी :- सार्वजनिक गणेशोत्सवाच्या कालावधीत उभारण्यात येणाऱ्या मंडपांची तपासणी करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार समित्यांची स्थापना करण्यात आली असून त्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुंबई उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० चा निकाल देताना मा.उच्च न्यायालयाने मंडपांची तपासणी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.त्यानुसार या पथकांची स्थापना करण्यात आली आहे. लातूर शहर महानगरपालिका हद्दीत असणाऱ्या ४ पोलीस ठाण्यांतर्गत ही चार पथके तयार करण्यात आली आहेत.यात संबंधित ठाण्याचे पोलीस निरीक्षक, नायब तहसीलदार व मनपाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्याचा समावेश आहे.

एमआयडीसी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रासाठी स्थापित समितीमध्ये पोलीस निरीक्षक बाबासाहेब नरवाडे (संपर्क क्र.९५६१०४५३०६ ), नायब तहसीलदार सतीश कांबळे ( ९५४५२९२९०१) आणि अ झोनच्या क्षेत्रीय अधिकारी श्रीमती निर्मला माने (७०२८५२७०७२) यांचा समावेश आहे. शिवाजीनगर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रासाठी असणाऱ्या समितीमध्ये पोलीस निरीक्षक दिलीप सागर (९५५२६६४३००),नायब तहसीलदार गणेश सरोदे (७५८८५३३१८४) व ब झोनचे क्षेत्रीय अधिकारी विजय राजुरे (९०११०१०७७७) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.विवेकानंद चौक पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रासाठी पोलीस निरीक्षक संतोष पाटील (९९२३८७१९९९), नायब तहसीलदार परमेश्वर कांबळे (९४२१४००२५१)व सी झोनचे क्षेत्रीय अधिकारी पवन सुरवसे (९५९५२७२६९२) यांचा समितीत समावेश करण्यात आला आहे. गांधी चौक पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रासाठी स्थापित समितीत पोलीस निरीक्षक सुधाकर देडे (८७६७६१७८८४),नायब तहसीलदार भीमाशंकर बेरूळे (७५८८६९२४६१) आणि डी झोनचे क्षेत्रीय अधिकारी अजित डोपे (८८०६८२२४६२)यांचा समावेश आहे.

गणेशोत्सवासाठी उभारलेल्या मंडपा संदर्भात नागरिकांच्या तक्रारी असतील तर त्यांनी संबंधित क्षेत्रासाठी नियुक्त समितीमधील सदस्यांकडे तक्रारींची नोंद करावी,असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हा रुग्णालयासाठी माझं लातूर परिवाराची पालकमंत्री महाजन यांच्याशी निर्णायक चर्चा

### प्रशासकीय स्तरावर हालचालींना वेग कुठल्याही परिस्थितीत निधी उपलब्ध करुन देण्याचे आरोग्य विभागाच्या सचिवांना दिले आदेश

लातूर:-जिल्हारुग्णालयासाठीमाझंलातूरपरिवाराचीपालकमंत्रीमहाजनयांच्याशीनिर्णायकचर्चा प्रलंबित लातूर जिल्हा रूग्णालय हस्तांतरण निधी वर्ग करून त्वरित भूमिपूजन करावे अशी मागणी माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री गिरीष महाजन यांच्याकडे पुन्हा एकदा केली. उदगीर येथे नियोजित राष्ट्रपती यांच्या उपस्थितीत होत असलेल्या सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी ते लातूर विमानतळावर उतरले होते. लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीसाठी शासनाने जागा हस्तांतरण करण्यास मंजुरी दिलेली आहे. यासाठी लागणारा मोबदला रुपये ३ कोटी ३२ लाख ६८ हजार ६५० रुपये कृषी विभागास देण्याची तरतूद देखील केली आहे. मात्र अद्याप यासाठीचा निधी आरोग्य विभागाने कृषी विभागास वर्ग केलेला नाही. हा निधी त्वरीत वर्ग करून लातूरच्या प्रलंबित आणि मंजूर असलेल्या जिल्हा रुग्णालयाचे भूमिपूजन करून लातूरकरांना उपकृत करावे अशी विनंती यावेळी करण्यात आली. हा निधी वर्ग करून ६० दिवसांच्या आत जिल्हा रुग्णालय हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे असा शासन आदेश (१९ जून २०२४) आहे. याची मुदत १९ ऑगस्ट २०२४ रोजी संपली आहे. गेल्या १५ वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न शासनाने मार्गी लावावा यासाठी माझं लातूर परिवाराने निर्णायक लढा दिला आहे. ऐतिहासिक साखळी उपोषण, मंत्रालयात



जाऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालक मंत्री यांना विनंती केली होती. जिल्ह्याचेपालकमंत्री म्हणूनआपणहाप्रश्नत्वरितमार्गीलागेलयासाठीत्वरीतनिर्देशद्यावेतअसाहट्ट माझं लातूर परिवाराच्या शिष्टमंडळाने केला. या विषयाचे गांभीर्य ओळखून महाजन यांनी राज्याचे मुख्य आरोग्य सचिव मिलिंद म्हैसकर यांच्याशी फोनवर संपर्क साधला आणि कुठल्याही परिस्थितीत निधी उपलब्ध करून तो कृषी विभागास वर्ग करावा असे आदेश दिले. एवढ्यावरच न थांबता त्यांनी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनाही फोन करून निधी उपलब्ध होत नसेल तर विना मोबदला जमीन हस्तांतरण करून द्यावी अशी मागणी केली. असा प्रस्ताव आरोग्य विभागाने सादर करावा आम्ही विना मोबदला जमीन हस्तांतरण करून देऊ असे आश्वासन मुंडे यांनी दिल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. याप्रसंगी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, तहसीलदार सौदागर तांदळे यांची उपस्थिती होती.

एकूणच या विषयावर लातूरच्या नागरिकांतून वाढत चाललेला रोष आणि दबाव पाहता येत्या काही दिवसात हा प्रश्न मार्गी लागेल असा विश्वास माझं लातूर परिवाराने व्यक्त केला आहे. शिष्टमंडळात डॉ अर्चनाताई पाटील चाकूरकर, सतीश तांदळे, दिपरत्न निलंगेकर, अभय मिरजकर, डॉ सितम सोनवणे, डॉ जुगलकिशोर तोष्णीवाल, काशिनाथ बळवंते, उमेश कांबळे, गोपाळ झंवर, संजय स्वामी यांचा समावेश होता.

## आ. रमेशअप्पा कराड यांच्या मागणीची 'मांजरा' कडून दखल अखेर पाचट कपातीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग

लातूर : - मांजरा साखर कारखान्याने हार्वेस्टरद्वारे ऊस तोडणी केलेल्या उसाच्या वजनातून पाचटाचे वजन कपात करून शेतकऱ्याची लूट करण्याचा प्रयत्न केला याबाबत वेळोवेळी भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी आवाज उठवून अनेक प्रश्न उपस्थित केले होते. शेतकऱ्याचे हित लक्षात घेऊन केलेल्या मागणीची दखल घेऊन मागील २०२३-२४ गळीत हंगामातील उसाचा पुरवठा केलेल्या शेतकऱ्यांना पाचट कपातीची रक्कम देण्याचा निर्णय मांजरा कारखाना प्रशासनाला घ्यावा लागला.

गळीत हंगाम २०२३-२४ मध्ये मांजरा साखर कारखान्याकडे गाळपास येणाऱ्या हार्वेस्टरद्वारे ऊसतोड केलेल्या ऊसामध्ये पाचटाचे प्रमाण जास्त होते, हे कारण पुढे करून उसाच्या वजनातून पाचटाचे वजन कारखाना प्रशासनाने कपात करून शेतकऱ्याची लूट करण्याचा प्रयत्न केला होता. याबाबत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वातील केंद्र शासनाने एफआरपी प्रमाणे शेतकऱ्यांना उसाचे बिल देण्याचे बंधन साखर कारखान्यांना घातले. तेव्हापासून मांजरा परिवाराची रिकव्हरी का कमी झाली? शेतकऱ्याची जमीन तीच असताना उसात बदल झाला का पाण्यात बदल झाला असा प्रश्न उपस्थित केला. उसाची तोडणी मशीनद्वारे करून मोठ्या प्रमाणात अन्यायकारक कपात केली जात आहे त्याचबरोबर वजनात पाप, तोडणी पाप आणि भावात पाप असे अनेक प्रश्न उपस्थित केले होते. शेतकऱ्याच्या कामाचा, कष्टाचा मोबदला मिळालाच पाहिजे अशी आग्रही भूमिका आ. रमेशआप्पा कराड यांनी घेतल्याने कारखाना कार्यक्षेत्रातील गावा गावातील



बहुतांशी ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मांजरा कारखाना प्रशासनावर संताप व्यक्त करीत असल्याने अखेर आ. कराड यांच्या न्याय हक्काच्या मागण्यांची दखल मांजरा कारखाना प्रशासनाला घ्यावी लागली आणि हार्वेस्टरद्वारे ऊसतोड करून ऊस पुरवठा केलेल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यावर पाचट कपातीची रक्कम वर्ग करण्याचा निर्णय घ्यावा लागला. भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी कारखाना प्रशासनावर ताशोरे ओढल्यानेच उस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## नांदेडचे खासदार कै. वसंतराव चव्हाण कुटुंबियांचेलोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे,माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले सांत्वन

लातूर / प्रतिनिधी : - नांदेडचे खासदार वसंतराव बळवंतराव चव्हाण यांचे नुकतेच निधन झाले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, प्रदेश काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज गुरुवार दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी नांदेड जिल्ह्यातील नायगाव येथे जाऊन नांदेडचे खासदार कै. वसंतराव बळवंतराव चव्हाण कुटुंबियांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला. यावेळी रविंद्र वसंतराव चव्हाण, रणजीत वसंतराव चव्हाण, लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, हिंगोलीचे



खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार मोहन हंबर्डे, माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, लोहा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शरद पवार आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी,चव्हाण कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# आजच्या शिक्षणातील आव्हाने

शिक्षक दिनाच्या निमित्ताने, आपण शिक्षकांच्या अथक प्रयत्नांचा आणि समर्पणाचा सन्मान करतो. शिक्षक दिनाच्या निमित्ताने आजच्या शैक्षणिक स्थितीबाबत हा लेख प्रपंच शिक्षक दिन हा दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. यामागे एक महत्त्वपूर्ण इतिहास आहे. भारतात हा दिवस भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने साजरा केला जातो. डॉ. राधाकृष्णन हे एक महान शिक्षक, तत्त्वज्ञ, राजकारणी आणि आपल्या भारताचे पहिले उपराष्ट्रपती तसेच दुसरे राष्ट्रपती होते. त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणास्रोत होते. १९६२ मध्ये, डॉ. राधाकृष्णन राष्ट्रपती झाले. त्यावेळी त्यांच्या काही विद्यार्थ्यांनी आणि मित्रांनी त्यांचा जन्मदिवस साजरा करण्याची विनंती केली. त्यावर त्यांनी उत्तर दिले की, 'माझा जन्मदिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याऐवजी तो 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला गेला तर मला आनंद होईल.' त्यांच्या या विनंतीला मान देऊन ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला गेला. आजच्या बदलत्या जागतिक परिस्थितीत शिक्षकांची भूमिका अधिक गुंतागुंतीची आणि आव्हानात्मक होत आहे. शिक्षण क्षेत्रात झपाट्याने होत असलेल्या बदलांमुळे शिक्षकांना अनेक नव्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. तंत्रज्ञानाच्या विकासामुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. ऑनलाइन शिक्षण, डिजिटल साधने, व्हर्च्युअल क्लासरूम आणि ई–लर्निंग प्लॅटफॉर्म्स यांसारख्या गोष्टींनी शिक्षणाच्या पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. यामुळे शिक्षकांना नवीन तंत्रज्ञान शिकणे आणि त्याचा प्रभावीपणे वापर करणे आवश्यक ठरले आहे. परंतु, सर्व शिक्षकांना हे तंत्रज्ञान आत्मसात करणे सोपे असेलच असे नाही. यामुळे त्यांच्यासमोर नवीन आव्हान निर्माण झाले आहे. आजकालच्या विद्यार्थ्यांचे वर्तन, मानसिकता आणि शिकण्याची पद्धत मागील पिढ्यांपेक्षा खूप वेगळी आहे. सोशल मीडियाचा वापर, त्वरित माहिती मिळविण्याची सवय आणि कमी एकाग्रता हे आजच्या विद्यार्थ्यांचे काही सामान्य लक्षणे आहेत. या परिस्थितीत, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मानसिकतेला समजून घेणे आणि त्यांच्या शिकण्याच्या पद्धतीत बदल करण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपक्रमांमध्ये गुंतवून ठेवणे आणि शिकण्याची आवड निर्माण करणे हे शिक्षकांसाठी एक आव्हान बनले आहे. शैक्षणिक धोरणांमध्ये वेळोवेळी बदल होत असतात आणि यामुळे शिक्षकांना त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतीत बदल करावा लागतो. नव्या शैक्षणिक धोरणांनुसार अभ्यासक्रमात बदल, मूल्यांकनाच्या पद्धतीत बदल आणि अध्यापनाच्या नव्या पद्धती स्वीकारणे आवश्यक आहे. यामुळे शिक्षकांना सातत्याने नवीन ज्ञान आत्मसात करावे लागते आणि तेही विद्यार्थ्यांना समजेल अशा पद्धतीने शिकवावे लागते. शिक्षकांवर विद्यार्थ्यांच्या निकालांची जबाबदारी असते. परिणामी, गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांवर अधिक दबाव येतो. काहीवेळा हा दबाव शिक्षणाच्या गुणवत्ता सुधारण्याऐवजी निकालांवर लक्ष केंद्रित करण्यास कारणीभूत ठरतो. विद्यार्थ्यांच्या संपूर्ण विकासावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे असताना, केवळ परीक्षेच्या निकालांवर लक्ष ठेवणे हे शिक्षकांसाठी एक मोठे आव्हान आहे. शिक्षण क्षेत्रात सतत होणार्या बदलांमुळे शिक्षकांना सातत्याने प्रशिक्षणाची आवश्यकता असते. नवीन अध्यापन तंत्र, बदलते अभ्यासक्रम, नवीन तंत्रज्ञानाचा वापर यांसाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणे आवश्यक आहे. परंतु, हे प्रशिक्षण मिळवणे आणि त्यानुसार स्वतःला सुधारित करणे हे प्रत्येक शिक्षकासाठी सहजतेने शक्य असे नाही. आजकाल वर्गात विद्यार्थ्यांची सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विविधता वाढली आहे. पालकांची मुलांच्या शिक्षणाबद्दल जागरूकता वाढली आहे. यामुळे त्यांची शिक्षकांकडून अपेक्षा देखील वाढली आहे. काहीवेळा पालकांचा शिक्षण प्रक्रियेत अधिक हस्तक्षेप होतो, ज्यामुळे शिक्षकांच्या कामावर दबाव येतो. पालकांच्या अपेक्षा पूर्ण करणे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा सांभाळणे यातील समतोल राखणे हे शिक्षकांसाठी एक मोठे आव्हान आहे. शिक्षकांच्या कामाचा ताण आणि त्यांच्या मानसिक आरोग्याची समस्या एक मोठी चिंता आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडवताना येणारे तणाव, पालकांची अपेक्षा, शैक्षणिक धोरणातील बदल आणि विविध शैक्षणिक समस्यांमुळे शिक्षकांना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. यामुळे शिक्षकांना स्वतःच्या मानसिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात. विविध प्रकारच्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना समान शिक्षण मिळवण्यासाठी शिक्षकांना विशेष प्रयत्न करावे लागतात. यासाठी विशेष शिक्षण तंत्रज्ञान, समावेशी शिक्षण पद्धती आणि योग्य साधनांची आवश्यकता असते. मात्र, या सर्व गोष्टींची माहिती व प्रशिक्षण मिळवणे हे शिक्षकांसाठी आव्हानात्मक ठरते. पारंपरिक शिक्षण पद्धतींमध्ये शिक्षक मुख्यतः ज्ञान देणारा आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणारा होता. परंतु, सध्याच्या बदलत्या युगात शिक्षकांची भूमिका अधिक व्यापक आणि बहुविध प्रकारची झाली आहे. आजच्या शिक्षकांना फक्त ज्ञान देणारी व्यक्ती म्हणून पाहिले जात नाही, तर ते विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवणारे, मार्गदर्शक आणि सल्लागार देखील आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत आणि त्यांच्या भावनिक, मानसिक व सामाजिक गरजांवर लक्ष देतात. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे शिक्षकांना विविध डिजिटल साधनांचा उपयोग करावा लागतो. ऑनलाइन शिक्षण, ई–लर्निंग प्लॅटफॉर्म्स, आणि शैक्षणिक ॲप्स यांचा वापर करून शिक्षक विद्यार्थ्यांना अधिक प्रभावीपणे शिक्षित करत आहेत. शाळा व महाविद्यालयांनी अभ्यासक्रमात बदल करून ते अधिक समकालीन आणि स्पर्धात्मक परीक्षा अनुकूल बनवावे. यामुळे विद्यार्थ्यांना बाह्य कोचिंग क्लासेसची आवश्यकता कमी होईल. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वानुसार व आवश्यकतेनुसार मार्गदर्शन द्यावे. यामध्ये विद्यार्थ्यांची शक्ती आणि कमतरता लक्षात घेऊन अभ्यासाच्या पद्धती ठरविणे समाविष्ट असावे. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आधुनिक शिक्षण तंत्रज्ञान, सहभागात्मक शिकवणी व अद्ययावत शिक्षण तंत्रांचा वापर करणे आवश्यक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षक व शैक्षणिक साधनांचा वापर करून एक आदर्श शिक्षण वातावरण निर्माण करणे महत्त्वाचे आहे. हे सर्व उपाय शाळा व महाविद्यालयांच्या गुणवत्तेवर प्रभाव टाकतात आणि कोचिंग क्लासेसची आवश्यकता कमी करू शकतात. शिक्षक आता केवळ शैक्षणिक ज्ञान देण्यावर लक्ष केंद्रित करत नाहीत, तर जीवनकौशल्यांवर देखील लक्ष देतात.

# बाप्पांच्या स्वागतासाठी संपूर्ण महाराष्ट्रात घरोघरी जय्यत तयारी.

बाप्पाच्या आगमनाची संपूर्ण भक्तगण आतुरतेने वाट पाहत होते आणि ती वेळ काही क्षणातच येणार. बाप्पाच्या आगमनासाठी घरोघरी जय्यत तयारी सुरू आहे.यासाठी लायटींग व इतर रोशनाईच्या साहीत्यांनी संपूर्ण तयारी झालेली आहे. फक्त वाट आहे आगमनाची. संपुर्ण महाराष्ट्र श्रीगणेशाचे वाजत–गाजत आगमन होणार व संपूर्ण महाराष्ट्र सलग १० दिवस गणरायात तल्लीन होऊन आपल्याला आगळेवेगळे वातावरण दिसून येईल.सृष्टीचे पालनहार भोले शंकर तर त्यांचे पुत्र गणपती बाप्पा विघ्नहर्ता व ज्ञानदाता आहेत.त्यामुळे लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत श्रीगणेशाच्या भक्तीभावामध्ये तल्लीन होऊन जातात.यामुळे सलग १० दिवस आपल्याला उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण दिसून येते. त्यामुळेच श्रीगणेशांना सर्वच बाबतीत प्रथम स्थान देण्यात आले आहे. गणपती बाप्पा हिंदू धर्मातील आराध्य दैवत मानल्या जाते. कोणतीही पुजा–अर्चना असो सर्वप्रथम श्रीगणेशाची पूजा केली जाते.नंतरच इतर देवतांची पूजा केली जाते.कारण श्रीगणेश म्हणजे बुद्धीचा सागर,शांतीचे प्रतीक व बालगोपालांचे आवडते बालगणेश आणि सर्वांचे लाडके दैवत.देशात कोणत्याही देवी–देवतांची पुजा असो परंतु आरतीची सुरूवात सुध्दा गणपतीच्या आरती पासून होते. याचाच अर्थ पृथ्वीतलावर गणेश वंदनेला सर्वप्रथम प्राधान्य देण्यात येते.रावणासारख्या महाकाय शक्तीला रोखण्याचे काम मुख्यत्वेकरून श्रीगणेशांनी केले. श्रीगणेशांना अनेक नावांनी संबोधले जाते गौरी पुत्र,अष्टविनायक अशा अनेक नावांनी श्रीगणेशांची पुजाअर्चना केली जाते.गणेशजी देवता आदिदेव असल्याने त्यांचे प्रत्येक युगात वेगवेगळे अवतार पहायला मिळतात.गणेशजीला चार हात असतात हे चारही हात म्हणजे वेगवेगळ्या दिशांमध्ये व्यापकतेचे प्रतिक मानल्या जाते.देवी पार्वती आंघोळीला गेली असता गणपतीला पार्वतीने सांगितले की माझी आंघोळ होत नाही तोपर्यंत घरात कुणालाही प्रवेश द्यायचा नाही.गणपतीने आई पार्वतीला वचन दिले की ठीक आहे.कोणालाही घरात प्रवेश करू देणार नाही.परंतु तेवढ्यात भगवान शंकरजी दारात आले आणि म्हणाले की बेटा हे माझे घर आहे मला घरात जाऊदे.गणेशजीने भगवान शंकरजीना प्रवेश नाकारला व क्रोधित होवून गणपतीचे डोके त्याच्या धडापासून वेगळे केले.हे पाहुण आई विचलित झाली व काही क्षणातच शंकरजीला आपली चूक लक्षात आली आणि आपल्या दैवी शक्तीच्या आधारावर गणपतीच्या धड्यावर गजाचे मस्त ठेवले आणि गणपतीला जिवदान मिळाले. भगवान शंकरजीनी आपली चुक कबुल करत संपूर्ण ब्रम्हांडात गर्जना केली की पुजेचा पहिला मान गणपतीला दिला जाईल असे गणपतीला वरदान दिले.म्हणुनच गणपतीची प्रथम पुजा केली जाते.यातुन मानवजातीला संदेश जातो की श्रीगणेशाने आईच्या आदेशाचे पालन केले त्याचप्रमाणे आपण सुद्धा आईच्या आदेशाचे पालन केले पाहिजे.म्हणुनच लहान मुले श्रीगणेशाच्या भक्तीभावामध्ये तल्लीन झालेले दिसतात. श्रीगणेश विवाहित होते त्यांना दोन बायका होत्या एकीचं नाव रिद्धी आणि दुसरीचे नाव सिद्धी होते.यांना दोन मुलं होती शुभ आणि लाभ त्यामुळे प्रथम पुजा गणेशची होते व सोबतच शुभ–लाभ दिसून येते.यात आपल्याला सर्वत्र शुभ संकेत दिसून येतात.आपल्याला अनेक पुराणांमध्ये गणपतीचे अनेक नावे पहायला मिळतात यात एकदंत, विनायक, लंबोदर, भालचंद्र, गजानन इत्यादी विभिन्न नावांनी आपण श्रीगणेशाची आराधना करीत असतो.त्याचप्रमाणे ज्योतिष शास्त्रानुसार श्रीगणेशांना केतू म्हणून ओळखले जाते केतू हा शांत ग्रह असल्याने संपूर्ण सृष्टीत सावलीची भुमिका पार पाडते व राहु ग्रहांच्या विरोधात सदैव ठाम भूमिका बजावीत असते. त्यामुळेच म्हणतात विरोधाशिवाय ज्ञान नसते आणि ज्ञानाशिवाय मुक्ती नसते. त्यामुळे गणपती देवता हिंदू धर्मातील बुध्दीचा सागर,बुद्धीचा अधिष्ठाता,विघ्नांचा नियंत्रक मानला जाणारा देव आहे म्हणूनच श्रीगणेशाला आपण विघ्नहर्ता म्हणतो.भारत अनेक धर्मांनी, जाती–पंथाने विनलेला देश आहे.त्यामुळे प्रत्येक धर्म आपापल्या पद्धतीने आपापल्या संस्कृती प्रमाणे सण उत्सव साजरे करतांना दिसतात.भारतात प्रत्येक दिवसाला वेगवेगळ्या देवी–देवतांची महत्त्व आहे त्यापध्दतीने पुजा–अर्चना केली जाते. प्रत्येक गणेश चतुर्थीला गणेशाची आराधना करून भक्तगण उपवास करतात व आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात.परंतु भाद्रपद महिन्यातील शुद्ध चतुर्थी म्हणजे गणेशोत्सव.गणेशमुर्तीची स्थापना करून गणेशोत्सव तब्बल १० दिवस चालतो.या कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात आपल्याला झगमगाट दिसून येते. यापध्दतीने गणेशोत्सवाचा आनंद संपूर्ण भक्तगण मोठ्या गुना गोविंदाने आणि आनंदाने साजरा करतात.लोक गणेशोत्सवात इतके तल्लीन होऊन जातात की १० दिवस कसे गेले हे कोणालाच कळत नाही.गणपती बाप्पांनी पुन्हा लवकर याव यासाठी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर याघोषणांचा गजर करत गणपती बाप्पाला निरोप दिला जातो.इंग्रजांना शह देण्यासाठीच लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरूवात केली.गणेशोत्सवाच्या निमित्ताने जनजागृती करून इंग्रजां विरूद्ध मोठा लढा उभा केला व आक्रमक पवित्रा निर्माण केला.त्यामुळे गणेशोत्सव हा सण स्वतंत्र लढ्यासाठी सूध्दा कारगर सिध्द झाला. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाची लावलेली परंपरा आजही संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. लोकमान्य टिळकांनी त्याकाळी स्वातंत्र्यासाठी गणेशोत्सवाची सुरुवात केली.परंतु आज आपल्याला समाज घडविण्यासाठी व जनजागृतीसाठी गणेशोत्सवाला सामोरं नेण्याची गरज आहे.या अनुषंगानेच समाजात चांगले वातावरण निर्माण होईल.पुराणानुसार परशुराम एकवीस वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय करून कैलासी आले असता दरबार रक्षक गणेशाने त्यास अडवले व दोघांमध्ये घनघोर युद्ध झाले.यात परशुरामाच्या परशुमुळे गणेशाचा एक दात तुटला त्यामुळे श्रीगणेशांना एकदंत सूध्दा म्हणतात असे पुराणामध्ये नमुद आहे.गणेशाला पुजेचे स्थान प्रथम असल्याने आपण पाहतो प्रत्येक मंदिरात आपल्याला गणेशाची मूर्ती दिसुन येते ते मग कोणतेही मंदिर असो. गणेशाचे मुख्य वाहन मुशकराज (उंदीर) त्यामुळे श्रीगणेशा सोबतच उंदराची सूध्दा पुजा–अर्चना केली जाते. पुजेमध्ये मुख्यत्वेकरून दुर्वा,बेल–फुल, शम्मीपत्र, शेंदूर यांचा वापर होतो.भारतात श्रीगणेशांची अनेक मोठ–मोठी मंदिरे आहेत.त्याचबरोबर नेपाळमध्ये आपल्याला गणेशाची असंख्य मंदिरे पहायला मिळतात. कारण श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक घरामध्ये मुख्य दारावर गणपतीची फोटो अवश्य आपल्याला दिसुन येते.आपल्याला द्वेी–देवतांनी पृथ्वीची रक्षा करण्यासाठी पृथ्वीतलावर जन्म दिला.परंतु मानवजातीने या धरतीमातेचा दुरूपयोग केल्यामुळे पृथ्वीतलावरील निसर्गाचा दिवसेंदिवस ह्यास होत आहे.याला वाचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या निमित्ताने गणेश स्थापणेपासुन महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात १० दिवस वृक्ष लागवडीची मोहीम सरकार मार्फत, सामाजिक संघटनांन मार्फत,शाळां मार्फत व संपूर्ण गणेश मंडळांच्या मार्फत राबवली पाहिजे.यामुळे संपूर्ण भारतात हिरवागार गालिचा निर्माण होईल व येणारे महाप्रलय,भुकंप ,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी, ज्वालामुखीचा उद्रेक अशाप्रकारे निसर्गाचे बिघडलेले संतुलन रोखण्यास श्रीगणेशाच्या आशीर्वादाने वृक्ष लागवडीची मोठी मदत होईल.यातही आपल्याला गणेशोत्सवाचा आनंद आणि श्रीगणेश अवश्य दिसून येईल. गणपती बाप्पा मोरया!

**********

लेखक–
रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# तूच कर्ता आणि करविता विघ्नहर्ता

गणेश चतुर्थी हे मराठी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेशाच्या अवतारांपैकी गणेश याचा जन्म भाद्रपद शुक्ल चतुर्थीला झाला असे मानले जाते. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा शिवा असेही म्हणले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. गणेशाला मोदक खूप आवडतात. म्हणूनच गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाला मोदकांचा नैवेद्य अर्पण केला जातो, त्याचप्रमाणे जास्वंदीचे फुल, शमी पत्री आणि दुर्वा या ही खूप आवडीच्या असल्यामुळे त्याही अर्पण केल्या जातात. उंदीर हे गणेशाचे वाहन आहे.स्त्रीमनाचे लोकदैवत असे ही श्री गणेशाला मानतात. गणेश चतुर्थीच्या पहिल्या दिवशी गणपतीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते आणि गणपतीच्या पूजेनंतर आरती केली जाते. प्रमुख्याने माती पासूनच बनवलेल्या गणेश मूर्तिचे पूजन केले जाते.

पत्रकारितेच्या इतिहासातील प्रखर तेजस्वी सूर्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या नांवे 'जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ट पत्रकारांना मिळतो. याचाच अर्थ असा लो. टिळकांच्या राष्ट्रभक्ति, लोकशक्ति आणि अन्याय मुक्तिला वाहिलेल्या ओजस्वी पत्रकारितेचे परंपरा आजही अखंड अविरत चालू आहे असाच होतो. लोकमान्य टिळक हे ब्रिटिश सरकार बद्दल लोकांच्या मनात असंतोष निर्माण करणारे नेते म्हणून एकीकडे कार्य करीत होते. त्याचवेळी त्यांचा आवडत्या विषयांचा अभ्यासही चालू होता. त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवर सामाजिक परिस्थितीवर आणि प्रासंगिक घटनांवर 'केसरी'तून लेख करतानांही टिळकांनी आर्याचे वस्तिस्थान 'ओरायन' शास्त्रीय पंचांग 'गितारहस्य' असे ग्रंथ लिहून आपल्या अभ्यासाचा परिचय घडविला. यापुढील काळात सामाजिक सुधारणेच्या प्रश्नावरुन टिळक व आगरकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. भारतीयांना एकत्र आणण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात लोकमान्य टिळकांनी १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक व सामाजिक सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशोत्सव आणि शिवजयंती या प्रसंगांचे औचित्य साधून टिळकांनी युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा प्रयत्न केला.

भारतीय संस्कृतीत प्रत्येक तत्व मनावर ठासविण्यासाठी काही प्रतिके सांगीतलेली आहेत. आम्हाला बाप्पा तू सद्सदविवेक बुध्दीचे प्रतिक वाटतोस. चांगल्या वाईटाचा सत्य–असत्याचा, पाप–पुण्याचा निवाडा करण्याची क्षमता देणारा तू देव आहेस. म्हणुनच तुला बुध्दीदाता म्हटले जाते. आज समाजाला या सद्सद्विवेक बुध्दीदात्या श्री गणेशाची पूर्वी कधी नव्हती एवढी आज गरज आहे. कारण आजवर नव्हता एवढा समाज अध:पतनाच्या उंबरठयावर उभा आहे. तुझ्यापुढे उभे राहिल्या वर माणसाच्या मनातल्या सद्भावना, सहानुभुती, सहृदयता, सज्जनता, सद्विचार, समभावना, सहभावना जाग्या होतात आणि तो 'मी' ऐवजी 'आपण' 'माझे' ऐवजी 'आपले' असा विचार करायला आपण प्रवृत्त होतो, हेच तुझे अवतार कार्य आहे.

भारतीय संस्कृतीत मूर्ती पूजाही एक थोर आणि मधुर अशी कल्पना आहे. माणसाला स्वत:चा उतरोत्तर अधिक विकास करुन घेता यावा म्हणुन जी अनेक साधने भारतीय संस्कृतीने निर्माण केली, त्यातील एक आहे मूर्तीपूजा. मनुष्य प्राणी हा जन्मत:च विभूती पूजक आहे. आपल्या पेक्षा जे मोठे आहेत, त्यांचे आपण कौतूक करतो. आपल्याहून जे थोर आहेत बुध्दीने, प्रतिमेने, विचाराने महान आहेत त्यांची पूजा करावी असे माणसाला वाटते. ही पूजा आपण त्यांच्या आदर्शाची करतो, म्हणूनच त्या आदर्शाचे अनुकरण करण्याची प्रेरणा मनाला कार्य प्रवृत्त करते.

बाप्पा ! तुझ्या आगमनानं आज सारं महाराष्ट्र राज्य रोमांचित, हर्ष भरित झालं आहे. खरोखरंच राज्याची काही पुण्याई आहे, म्हणुन संभवामि, युगे–युगे असे म्हणत. हजार पाचशे वर्षातून केव्हा तरी एकदा अवतार घेणारा परमेश्वर, दरवर्षी नित्य–नेमाने तुझ्या रुपाने या राज्यात अवतरतो. तेव्हा गहिवरुन येतं, तुझ्या नुसत्या दर्शनाने पोर्णिमेच्या चंद्राला पाहुन सागराला भरती यावी, तशी जन सागराला उचंबळुन भावनांची भरती येते. तुझ्या नुसत्याना मोच्चाराने जीवनातील दुख: संकटे, विघ्ने, अडचणी, प्रश्न, समस्यायांना सामोरे जाण्याची शक्ति–स्फुर्ती लाभते. तुझ्या नामस्मरणात अपारसाम आहे. भारतीय संस्कृतीचे मांगल्य, तुझ्या मुर्तीत एकवटलेले आहे. उत्तुंग आणि भव्य तुझ्या मुर्तीमध्ये आम्हाला हिमालयाच्या गिरी शिखरावरील शिव, कन्याकुमारीच्या तेजस्विनीचे सौंदर्य आणि वेद–उपनिषद–रामायण–महाभारतातील, सत्याचा म्हणजे सत्य–शिव–सुंदरतेचा प्रत्यय येतो. शिवाची शक्ति, सत्त्याचे सामर्थ्य आणि सौंदर्यातील ममत्व तुझ्या ठायी सामावलेले आहे. म्हणुनच तु भक्तांच्या नवसाला पावतोस, त्यांची मनोकामना पूर्ण करतोस, त्यांच्यावरील संकटाचे निवारण करतोस कारण तू जगज्येठी आहेस, तूच कर्ता–करवीता आहेस.

तुझ्या ठायी, ज्ञान–भक्ति आणि कर्मयांचा हृदय यंगम संगम आहे. तू खरा उदारदाता आहेस, मेघ जसे सारे पाणी देऊन टाकतात, झाडे–फळे देऊन टाकतात, फुले सुगंध देऊन टाकतात, नद्या ओलावा देऊन टाकतात, सुर्य–चंद्रप्रकाश देतात. तूही 'जो–जो वांछिले, तो तेलाहो' म्हणत साऱ्या भक्तांची इच्छापूर्ती करतोस. तू समाजाती लदंभ, आळस, अज्ञान, रुढी, भेद–भाव, उच्च निंच पणा, वौमनस्य, दारिद्र्य, दु:ख, दैन्य, दुबळेपणा, भ्याडपणा दुर व्हावा. यासाठी तुझ्या विचारांचे, प्रेरणांचे अधिष्ठान, ही आजच्या समाजाची गरज आहे.

तुझ्या आगमनाने राज्याचे रुपांतर दहा दिवसांकरीता अक्षरश: तिर्थक्षेत्रात होते, अख्खा महाराष्ट्र ढवळून निघतो. सारेजण धर्म–भाषा, जाती–पंथ प्रदेश असे सारे भेद विसरुन तुझ्या दर्शनाच्या रांगेत 'भाविक' येतो, या एकाच जातीचे असतात. मनाची क्षुद्रता गळून पडलेली असते, जीवनाला सुंदर करणारे आणि मनाला सुखी करणारे असे ते रुप बाप्पा सर्वांच्यापुढे असते. दु:खाचा, समस्या, संकटाचा विसर पडलेला असता. आनंद, उत्साह, चैतन्य यांनी रोम–रोम पुलकित झालेला असतो. एका तेजाची उपासना आपण करीत आहोत, या अनुभवातून सारे गणेश भक्त तुझ्या सानिध्यात आल्यावर जात असतात. तू बुध्दीचा देव आहेस, परमेश्वर म्हणजे ज्ञान अशी आमची भारतीय संस्कृती सांगते. आम्ही सारे आस्तिक आहोत. कारण आमची तुझ्या जागृत अस्तित्वावर श्रध्दा आहेत. पण तुझे सामर्थ्य असे अगाध आहे की, तुझ्या दर्शनाने नास्तिकांचे ही रुपांतर आस्तिकात होईल. पाप्याला आपल्या पापाची लाज वाटेल, भ्रष्टाचा ज्याला शरम वाटेल हा तुझा महिमा आहे, म्हणुन तू आमच्यासाठी वरदान आहेस. जेव्हा आम्ही पाहतो, तेव्हा गणेशोत्सव, सुरु करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या स्वप्नांची पूर्ती बाप्पा तूझे सेवक, सामाजिक बांधिलकेच्या भूमिकेतून करतांना पाहून आम्हा भक्तांचा हात अधिक देण्यासाठी आणि ऋण फेडण्यासाठी उतावीळ होतो. अयोग्य कर्मापासून रोखतेही, मूर्तीपूजा हे मानसीक, बौध्दीक विकासाचे साधन हजारो वर्षापासून आहे. म्हणूनच बाप्पा तुझे 'अस्तित्व' चिरंतन आहे. हे ठाऊक असुनही आम्ही गणेश चतुर्थीला तुझी मूर्ती आनंदाने, अभिमानाने मिरवत देहभान विसरुन, गात–नाचत दहा दिवसांकरीता आणतो, आणि प्राणांच्या ज्योती करुन तुझ्या तेजाची आरती करतो. त्यासाठी आम्हाला तू मूर्तीरुपात हवा असतोस. तू विराट विश्वंभर आहेस, पण आम्ही तूझे पाईक आहोत. आमचे सर्व संकटापासुन ती येण्या आधीच रक्षण–निवारण कर आम्हाला सुख–समाधान, मन:शांती, आरोग्य, समृध्दि, समता–बंधुता–न्याय लाभू दे, हीच तुझ्या चरणी प्रार्थना !

***********

प्रविण बागडे
जरीपटका, नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९


# स्त्रीयावरिल वाढते अत्याचार : राष्ट्रीय चिंतेचा विषय


भारतात स्त्रीयांवर अत्याचार हे अनेक वर्षापासून कमी– अधिक प्रमाणात होत आहेत. इतकच की त्याचे स्वरूप आजच्या इतके व्यापक, क्रूर, भयानक आणि पशूलाही लाजवेल असे अत्याचार एकामागोमाग होत नव्हते. भारतीय गुन्हे नोंदणी –विभागाचे आकडे सांगतात की, भारतात प्रत्येक दिवशी बला– – त्काराचे सरासरी ८७ (सत्याऐंशी गुन्हे नोंदले जातात. एका जिल्हयाचे उदाहरण म्हणून घेतले तर ३ सप्टेंबर रोजी प्रसिध्द झालेल्या लातूर जिल्हा विविध पोलिस ठाण्याच्या हद्दीत मागील ८ महिण्यामध्ये २८ अत्याचाराच्या घटना, १२५ जणींचा –विनयभंग, तर पोक्सोअंतर्गत ६५ गुन्हे दाखल आहेत. यात ४१ अल्पवयीन मुलीवर अत्याचार, २४ अल्पवयीन मुलींचा विनयभंग तर २८ (१८ वर्षावरिल) महिलावर अत्याचार झालेले आहेत तर देशपातळीवरिल लैंगिक स्वरूपाच्या इतर गुन्ह्यांची संख्या यात धरलेली नाही. बलात्कारासंबंधीचे आकडे हे केवळ नोंदल्या गेलेल्या गुन्ह्यांचे आहेत. भारतात जरी लोकशाही व्यवस्था प्रस्थापित होऊन संविधानिक शासन प्रणाली चालत असली तरी आजही ग्रामीण भागामध्ये स्त्रीयांकडे त्यांच्या गरीबी वरून व जाती समाजरचनेतील (मनुप्रणित व्यवस्थेवरून) अल्पसंख्य जात समूहातील असल्याने तिच्यावर बहुतांश वेळी उपभोग्य वस्तू म्हणून अत्याचार, बलात्कारासारखेही प्रकार होतात पण ते गावपातळीवर दबाव आणून दाबून टाकले जातात. तसेच बलात्कार आणि लैंगिक गुन्हे करणाऱ्यामध्ये पिडीतेच्या निकटचे ही लोकच आज मोठ्या प्रमाणावर नैतिकता सोडून भक्षक होत आहेत. अशा दुदैवी घटना घडल्या की जागं , पेटून उठणं त्यावर तीव्र प्रतिक्रिया येणं आणि कांही काळाने पुन्हा एकदा येरे माझ्या मागल्या म्हणत सगळ पुर्ववत सुरु होणं ही आपल्या समाजाची वृत्ती आहे. बदलापूर येथे विमुरड्या बालिकेवर विद्यामंदिरातच झालेले बलात्कार, अत्याचार, कोलकत्त्याख्या वैद्यकीय महाविद्यालयातील घटना, अकोला येथील शिक्षकानेच विद्यार्थीनीवर केलेला अत्याचार, आश्रमात राहणाऱ्या वयोवृद्ध धार्मिक शिक्षकाकडून केलेला अत्याचार, म्हणजेच मुली, स्त्रीया ह्या घरी, दारी, पवित्रस्थळी, कुठेही सुरक्षित नाहीत. ६ वर्षाच्या बालिकां– – पासून ते १० वर्षाच्या वयोवृद्ध स्त्रीयावरिल बलात्कार, अत्याचार वाढत आहेत. ह्या उदाहरणादाखल ऑगस्ट महिण्यातील ताज्या घटना उल्लेख केलेल्या आहेत. सर्व घटनांचा उल्लेख जर केला तर आकडेवारी पाहून एखादया संवेदनशील माणसाची मती गुंग होऊन पायाखालची वाळू सरकल्याशिवाय राहणार नाही. आज खरच चिंता करण्याची बाब आहे . ज्या महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री उध्दारासाठी, स्त्रीयांच्या सामाजिक गुलामीच्या, दास्यत्वाच्या जुलमी शृंखला, साखळदंड तोडल्या व त्यांना घराबाहेर पडण्याची, शिकण्याची, नोकरी, व्यवसाय निवडण्याची व करण्याची, प्रत्येक क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने पुढे जाण्याची संधी. निर्माण केली. त्या संधीला भारतीय राज्यघटनेच्या द्वारे विश्वरत्न, थोर कायदेपंडित, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी अधिकृत कायदेशीर रित्या संरक्षण, बहाल केले. आज स्त्रीया मानाने, स्वाभिमानाने देशातील सर्वोच्च पदे पादाक्रांत करीत आहेत. ह्या आजच्या स्त्रीयावरिल होत असलेल्या अत्याचाराच्या बाबतीत देशाच्या सर्वोच्च स्थानी असलेल्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू म्हणतात, मी अत्यंत निराश आणि भयभीत आहे. असे राष्ट्रपतीना म्हणावे लागते म्हणजे आजची स्थिती भयंकर गंभीर आहे. आज आपण एक भारतीय म्हणून, समाजातला संवेदनशील घटक म्हणून प्रत्येक व्यक्तीने विचार करायला हवा, आज आपल्या एखादयाच्या कुटूंबातील स्त्रीवर अत्याचार झाला नाही म्हणून मला काय त्याचे असे म्हणून चालणार नाही. कारण ही वासनेची आग दिवसेंदिवस भडकत आहे आणि वेळीच ही आग विझवण्याची, शमवण्यासाठी प्रयत्न नाही केले तर पुढे कुणाच्या ही घरातील, नात्यातील स्त्री या वासनेच्या आगीत होरपळल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी त्याच्या मुळापर्यंत जावे लागेल. कोरोनासारख्या औषध उपलब्ध नसणाऱ्या महामारीवर आपण संशोधन करून औषध शोधून मानवांचा जीव वाचवला, आज गरज आहे मानवातील नष्ट होत चाललेली नैतिकता, शीलता, करुणा, माणूसकी वाचवण्याची. स्त्री वाचली सुराक्षत राहिली तरच कुटुंब व्यवस्था टिकून राहील. त्यावर उपाय शोधण्यासाठी सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते, विचारवंत, समाजशास्त्रज्ञ, स्त्री अभ्यासक, मानसोपचार तज्ञ त्या व इतर अनेक महत्त्वपूर्ण क्षेत्रातील तज्ञ व्यक्तिकडून सामाजिक, निरोगी आरोग्याच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात. हे जरी सर्व असले तरी माझ्या मते हातात असलेल्या मोबाईलवरील सहज उपलब्ध असणाऱ्या अश्लिल, वेबसाईट्स पूर्णतः व कायमच्या भारतातून हद्दपार कराव्या कोणी व्यक्ती अशाप्रकारच्या व्हीडीओज अथवा मजकूर पाहत असेल तर मानसशास्त्रीय दृष्ट्या त्याच्यावर लैंगीक भावनांचा उन्माद स्वार होतो. वासनांद होऊन तो अमानुष होऊन शिकार शोधतो आणि तो एखादया लहान मुलीवर बलात्कार करत आहे का वयोवृद्ध स्त्रीवर याचेही त्याला भान राहत नाही. आणि गुन्हा घडून एखादयाचे जीवन उध्वस्तच करीत नाही तर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात आल्यावर पुरावा नष्ट करण्यासाठी स्त्रीला / बालिकेला कायमचा संपवतो. त्यासाठी फेसबुक सारख्या समाजमाध्यमावर अशा आश्लिल चित्रफीत, असेल वा मजकूर तो प्रसारित करणा–याला कठोरात कठोर शिक्षा दिली पाहिजे. जेणेकरून – तसे व्हिडीओज दिसणार नाहीत. ही सर्व जबावदारी शासनावरच सोडून –चालणार नाही तर सर्वांनी त्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण जन्मतः कोणीही गुन्हेगार नसतो. गुन्हा करण्यासाठीची परिस्थिती निर्माण करण्यास पोषक वातावरण तयार करणाराच खरा गुन्हेगार असतो. स्त्रीयांच्या सुरक्षिततेबाबत काळजी व्यक्त करत असताना त्यांच्या स्वातंत्र्याचा संकोच होईल असे तालिबानी उपाय सुचविणारे महाभागही आपल्या देशात कमी नाही, असेही काही स्त्री स्वातंत्र्याच्या विरोधात आहेत. त्याचाही विचार करणे गरजेचे आहे. स्त्री पुरुष सहअस्तित्व, सहजीवन ही काळाची गरज आहे. ते सुहढ निरोगी करणं हे आपल्या सर्वांच्या हाती / सर्वांची जबाबदारी आहे.

**************

लेखक
कांबळे गौतमकुमार नागनाथराव (सहशिक्षक )
९८२२१७२८१८

# रोज जेवल्यानंतर खा १ पान, नसा होतील हलक्या विष पडेल बाहेर, सद्गुरूंचा अनमोल सल्ला





हिंदू धर्मात पूजेसाठी सुपारीचा वापर केला जातो आणि मुस्लिम धर्मातील लोक समृद्धीच्या प्रसंगी पानाचा आनंदाचे प्रतीक म्हणून वापरतात. पानामध्ये कत्था, गुलकंद आणि चुना मिसळून सुपारीसोबत खाणारे अनेक जण आहेत. मात्र याचे व्यसन करणे योग्य नाही. जेवणानंतर लोक अनेकदा पान आणि सुपारी खातात. तुम्हाला माहिती आहे का? सुपारीच्या पानात इतकी शक्ती असते की त्याद्वारे न्यूरोलॉजिकल समस्या दूर होऊ शकतात. या पानाचे सेवन केल्याने शरीराची क्रिया सुधारते. ईशा फाऊंडेशनचे संस्थापक सद्गुरू जग्गी वासुदेव यांनी या पानाचे महत्त्व सांगितले आहे. पान खाण्याचे नक्की काय फायदे आहेत, जाणून घ्या सद्गुरु जग्गी वासुदेव यांच्या मते, सुपारीच्या पानांचे सेवन केल्याने न्यूरोलॉजिकल सिस्टम निरोगी राहते. सुपारीचे पान क्षारयुक्त असल्याने पचनक्रिया सुधारते. याचे सेवन केल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. हे खाल्ल्याने शरीरातील अम्लीय विष निष्क्रिय होते. या पानात सापाचे विषही कमी करण्याची ताकद आहे असेही सद्गुरुंनी सांगितले आहे.

सद्गुरूंच्या मते हे पान देठापासून एक इंच अंतरावर कापल्यास त्याचे सर्व औषधी फायदे मिळू शकतात. देठ खूप जवळ कापल्याने त्याचे औषधी गुणधर्म नष्ट होतात. सुपारीचे सेवन केल्याने कोणते आरोग्य फायदे होतात आणि त्याचे सेवन कसे करावे. महत्त्वाचे म्हणजे सुपारीच्या पानामुळे रक्तवाहिन्यांचा कडकपणा कमी होतो आणि रक्तप्रवाह सुधारण्यास मदत मिळते.


न्यूरोलॉजिकल सिस्टम सक्रिय

पानांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या दूर करण्याची ताकद असते. या पानाचे सेवन केल्याने न्यूरोलॉजिकल गुंतागुंत दूर होते आणि गोष्टी समजून घेण्याची क्षमता सुधारते. याचे सेवन केल्याने विचार करण्याची आणि समजून घेण्याची क्षमता सुधारते. हे मज्जातंतूंचा कडकपणा कमी करते आणि न्यूरोलॉजिकल सिस्टम वाढवते. कधीकधी या पानाचे सेवन करणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. न्यूरोलॉजिकल सिस्टम सक्रिय करण्यासाठी या पानाचा जादुई प्रभाव आहे.

पानाचे सेवन केल्याने पचनक्रिया चांगली राहते. या पानाचे रोज जेवणानंतर सेवन केल्यास गॅस, सिडिटी आणि अपचन यांसारख्या पचनाच्या समस्यांपासून आराम मिळतो पोटातील घाणेरडे बॅक्टेरिया काढून टाकण्यासाठी हे पान गुणकारी आहे. बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म असलेले सुपारीचे पान शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकते

ही पाने तोंडातील बॅक्टेरियापासून मुक्त होण्यासाठी खूप प्रभावी आहेत. सुपारीच्या पानांमध्ये गॅस्ट्रो संरक्षणात्मक गुणधर्म असतात जे तोंडाच्या अल्सरपासून आराम देतात संधिवात वेदना कमी करण्यासाठी आणि दम्याचा उपचार करण्यासाठी या पानाचा जादुई प्रभाव आहे पानाचे सेवन कसे करावे सद्गुरुंनी सांगितले की या पानाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे या पानाचा मधला भाग. ते कधीही लांबीच्या दिशेने कापू नये. हे पान मधोमध कापल्यास त्याचे सर्व गुण मिळतात. पान जेवणानंतरच खावे. अन्नपचन होण्यास मदत मिळते. त्यामुळे लग्नसमारंभात आजही पान देण्याची पद्धत आहे. तर अनेकदा टपरीवर जाऊनही चुन्याशिवाय पान तुम्ही खाऊ शकता.

# गणेशोत्सवात ५ मिनिटांमध्ये चेहऱ्यावर आणा काचेसारखी चमक! ‘या’ पद्धतीने करा साखरेचा वापर





गणपती बाप्पाच्या आगमनाला अवघे काही तासशिल्लक राहिले आहेत. बाप्पाच्या आगमनाची सगळ्यांना ओढ लागल्यामुळे संपूर्ण मुंबईनगरीमध्ये एक वेगळाच आनंद आहे. सण उत्सवात सर्वच महिलांना सुंदर नटायला आणि थाटायला आवडत. महिला सुंदर दिसण्यासाठी काहींना काही करत असतात. सणासुदीच्या दिवसांमध्ये महिला इतर कोणत्याही ठिकाणी जाण्यऐवजी सगळ्यात आधी पार्लरमध्ये जातात. पार्लरमध्ये महागड्या ट्रीटमेंट करून घेणे, फेशिअल करणे, स्क्रबिंग करणे इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. पण इत्यादी सर्व उपाय केल्यानंतर सुद्धा त्वचा काही वेळासाठी सुंदर दिसते. पण काही दिवसांनंतर चेहऱ्यावर पुन्हा एकदा थकवा जाणवतो. चेहऱ्यावर थकवा जाणवू लागल्यानंतर त्वचेचे सौंदर्य कमी होऊन जाते. गणपतीच्या दिवसांमध्ये सगळ्यांची खूप धावपळ होते. धावपळीच्या दिवसांमध्ये अपुऱ्या झोपेमुळे डोळ्यांखाली काळी वर्तुळ येतात. तसेच चेहऱ्याचे सौंदर्य हळूहळू कमी होऊन जाते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला गणेशोत्सवात सुंदर चमकदार त्वचेसाठी साखरेचा वापर कसा करायचा याबद्दल सांगणार आहोत.कमीत कमी साहित्यामध्ये केलेले घरगुती उपाय त्वचेसाठी अतिशय प्रभावी आहेत. चला तर जाणून.लिंबू साखरेचा स्क्रब: लिंबूमध्ये असलेले विटामिन सी त्वचेच्या निरोगी आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. लिंबू, साखर त्वचेवर उत्तम स्क्रबिंग एजंट्स आहे. त्यामुळे चेहऱ्यावरील मृत पेशी काढून टाकण्यासाठी साखर आणि लिंबाचा वापर करावा. यासाठी एका वाटीमध्ये लिंबाचा रस घेऊन त्यात साखर मिक्स करा. मिश्रण तयार झाल्यानंतर चेहऱ्याला लावून ५ मिनिटं हलक्या हाताने चेहऱ्यावर मसाज करून घ्या. मसाज करून झाल्यानंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. यामुळे तुमच्या त्वचेवरील काळी झालेली त्वचा निघून जाईल.

तांदळाचे पीठ आणि टोमॅटोचा रस: त्वचेसाठी टोमॅटोचा रस अतिशय गुणकारी आहे.स्क्रब बनवण्यासाठी एका वाटीमध्ये २ चमचे तांदळाचे पीठ घेऊन त्यात टोमॅटोचा रस मिक्स करा. त्यानंतर जाडसर मिश्रण तयार करून संपूर्ण चेहऱ्याला लावा. चेहऱ्याला लावलेली पेस्ट १५ ते २० मिनिटं ठेवून नंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. टोमॅटोच्या रसामध्ये अँटिऑक्सिडंट्स त्वचेला ताजेतवाने ठेवण्यासाठी मदत करतात.

# बघता बघता होईल शरीराचा सांगाडा, जेवणाच्या ताटात जर नसतील १५ पोषक तत्व





दरवर्षी १ ते ७ सप्टेंबर या कालावधीत ‘राष्ट्रीय पोषण सप्ताह’ साजरा केला जातो. चांगल्या आरोग्यासाठी पोषणाच्या उपयुक्ततेबद्दल जागरूकता निर्माण करणे हा त्याचा उद्देश आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात सकस आहार घेणे खूप गरजेचे आहे. ज्याप्रमाणे इंजिनला पेट्रोल आणि डिझेल लागते, त्याचप्रमाणे शरीराला चालण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते.

शरीराला रोगांपासून वाचवण्यासाठी १५ पोषक तत्वांची गरज असते. पण काळानुरूप बदलत्या खाद्यपदार्थांच्या ट्रेंडमुळे ते लोकांच्या ताटातून पूर्णपणे गायब झाले आहेत. त्यामुळे लोक कमी वयातच गंभीर आजारांना बळी पडत आहेत. यासाठी नक्की काय करावे याबाबत अधिक माहिती आपण जाणून घेऊया. बहुतेक लोक वेळोवेळी पोटभर जेवतात, पण त्यातून शरीराला आवश्यक प्रमाणात पोषण मिळत आहे की नाही याकडे लक्ष देत नाही. विशेषत: मुले आवश्यक प्रमाणात पोषण आहार घेऊ शकत नाहीत आणि कुपोषणाला बळी पडतात. आपल्या आहारात कोणते पदार्थ आहेत आणि त्यातून काय पोषण मिळत आहे याचा विचारच केला जात नाही. मार्च १९७३ मध्ये अमेरिकन डायटेटिक्स असोसिएशनने युनायटेड स्टेट्समध्ये ‘छछ्थ’ आकडे पहिल्यांदा सादर केले. त्या काळात भारतातील सर्वाधिक मुले कुपोषणाला बळी पडली होती. या समस्येवर मात करण्यासाठी राष्ट्रीय पोषण सप्ताह साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या वर्षी ‘राष्ट्रीय पोषण सप्ताह’ची थीम ‘सर्वांसाठी पोषक आहार’ अशी आहे.निरोगी शरीरासाठी जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने, चांगले फॅट्स, पाणी आणि कार्बोहायड्रेट खूप महत्वाचे आहेत. या अत्यावश्यक पोषक घटकांची दोन प्रकारांमध्ये विभागणी केली आहे. प्रथम सूक्ष्म पोषक घटक आहेत ज्यात जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. मॅक्रोन्यूट्रिएंट्स हे असे पोषक तत्व आहेत ज्यांची शरीराला जास्त गरज असते. त्यात पाणी, प्रथिने, कर्बोदके आणि चरबी यांचा समावेश होतो. आहारात कोणते पौष्टिक तत्व असावे? पौष्टिक घटकांमध्ये कॅल्शियम, लोह, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ई, आयोडीन, लोह, रिबोफ्लेविन, फोलेट, झिंक, मॅग्नेशियम, सेलेनियम, थायामिन, नियासिन, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी ६ आणि व्हिटॅमिन बी १२ यांचा आहारात समावेश करणे खूप महत्वाचे आहे. हे सर्व पोषक तत्व शरीराला निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यास मदत करतात. अन्नामध्ये या पोषक तत्वांचा समावेश केल्यास शरीर अनेक गंभीर आजारांपासून दूर राहते. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासोबतच ते शरीराला तंदुरुस्त ठेवतात.

# लहान मुलं चपाती भाजी खायला कंटाळा करतात? मग मुलांच्या डब्यासाठी बनवा टेस्टी स्वीट सँडविच



लहान मुलांना डब्यामध्ये चपाती भाजी खायला आवडत नाही. अनेकदा मुलं चपाती भाजी खाण्याचा खूप कंटाळा करतात. अशावेळी पालकांना नकीच हा प्रश्न पडत असेल ना मुलांना डब्यामध्ये काय खायला द्यावं? लहान मुलं डब्यात दिलेली भाजी पाहून नाक मुरडतात आणि भाजी खातच नाहीत. काहीवेळा मुलं त्यांच्या आवडीची भाजी नसल्यामुळे डबा घेऊन जाण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळेच आज आम्ही तुम्हाला लहान मुलांच्या डब्यासाठी टेस्टी स्वीट सँडविच कसे बनवायचे याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हे सँडविच घाई गडबडीच्या वेळी किंवा इतर वेळीसुद्धा बनवता येते. अनेकदा सकाळच्या वेळी पालकांना खूप घाई होते. तेव्हा तुम्ही सोप्या पद्धतीमध्ये टेस्टी स्वीट सँडविच बनवू शकता. चला तर जाणून घेऊया रेसिपी. साहित्य: ब्रेड साखर पाणी वेलची पावडर तूप

कृती: टेस्टी स्वीट सँडविच बनवण्यासाठी सर्वप्रथम तुमच्या आवडीचे पांढरे किंवा गव्हाचे ब्रेड घेऊन त्यांच्या कडा कापून घ्या. पॅन गरम करण्यासाठी ठेवल्यानंतर पॅनमध्ये ब्रेड स्लाइस टाकून त्यात तुमच्या आवडीनुसार तूप टाकून भाजून घ्या. दोन्ही बाजूने खरपूस भाजून झाल्यानंतर ब्रेड काढून घ्या. दुसऱ्या पॅनमध्ये पाणी गरम करून त्यात साखर टाका. साखरेचा एकतारी पाक बनवून झाल्यानंतर त्यात वेलची पावडर टाकून मिक्स करा. गरम साखरेच्या पाकात भाजून घेतलेले ब्रेड स्लाइस टाकून दीप करून घ्या. लहान मुलांना सर्व्ह करताना वरून त्यांच्या आवडीचे काजू बदाम टाकून मुलांना खाण्यासाठी द्या.

# शिक्षक दिनानिमित्त गीतेद्वारे भगवान श्रीकृष्ण आपल्याला काय संदेश देतात ते जाणून घेऊया

भगवान श्रीकृष्ण हे केवळ अर्जुनचे मित्र किंवा सारथी नव्हते, तर अर्जुनच्या जीवनात भगवान श्रीकृष्ण एका अशा गुरूसारखे होते जे अत्यंत कठीण काळातही आपल्या शिष्याचा हात सोडत नाहीत. कोणत्याही शिष्याचे जीवन उजळण्यासाठी गुरू किंवा गुरूचा सहवास पुरेसा असतो. आज ५ सप्टेंबर. दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. सर्वपल्ली राधा कृष्णन यांचा वाढदिवस असल्यामुळे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. राधा कृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. गीतेद्वारे भगवान श्रीकृष्ण आपल्याला काय संदेश देतात ते जाणून घेऊया. देव आपल्या सर्वांमध्ये आहे. त्यांनाही वेदना होतात आणि प्रत्येक भावना जाणवू शकतात. आपल्यामध्ये असलेला हा देव आपला गुरु आहे, जो आपल्याला जीवनातील संघर्षाच्या रूपात खूप काही शिकवतो.महाभारतात अर्जुनाला गीतेचे ज्ञान देताना श्रीकृष्ण म्हणतात की, मनुष्याला स्वतःहून चांगले कोणीही जाणू शकत नाही. जगातील इतर कोणतीही शक्ती त्याचे मूल्यमापन करू शकत नाही. त्याला स्वतःबद्दल जेवढी माहिती आहे तेवढी इतर कोणालाही कळू शकत नाही. ज्या दिवशी माणसाला त्याचे गुण–दोष कळतात, तो महान होतो. भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, जो माणूस अनावश्यक काळजीत गुंततो तो आपला वेळ वाया घालवतो, म्हणून आपले ध्येय साध्य करण्यासाठी त्याने अनावश्यक चिंता आणि इच्छांपासून दूर राहून ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न करत राहावे.भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, क्रोध हा एक रोग आहे जो तुम्हाला आतून पोकळ करतो. जर तुम्ही नेहमी रागावत असाल तर तुम्ही आजारी पडाल.



तुमची ऊर्जा वाया जाईल आणि एक दिवस राग तुम्हाला घेरेल, म्हणून राग सोडणे आवश्यक आहे.श्रीकृष्णाने गीतेत म्हटले आहे की, साध्या माणसाशी केलेली फसवणूक तुमच्यासाठी विनाशाचे दरवाजे उघडते. सुरुवातीला कपटी माणूस आपल्या विजयाचा आनंद घेतो पण हळूहळू त्याचे नकारात्मक परिणाम दिसू लागतात आणि कपटी माणूस अधोगतीकडे वाटचाल करू लागतो. श्रीकृष्ण म्हणतात की, या जगात तुम्हाला तुमचा इच्छित मित्र किंवा सोबती मिळेलच असे अजिबात नाही, पण एकटे राहण्याच्या भीतीने तुम्ही चुकीचा जोडीदार निवडू नका, अन्यथा त्याचे परिणाम खूप वाईट होऊ शकतात. करू शकता. ज्याला कोणी नाही, त्याच्याकडे देव आहे हे नेहमी लक्षात ठेवावे.भगवान श्रीकृष्ण म्हणतात की, माणसाने कधीही अहंकारी राहू नये. गर्विष्ठ व्यक्ती नेहमी पतितच असते, मग ती व्यक्ती कितीही प्रतिभेने समृद्ध असली तरीही, म्हणूनच योद्ध्याने गर्विष्ठ होणे टाळले पाहिजे. श्रीकृष्णाने कर्मयोग, भक्तियोग आणि ज्ञानयोग हे कल्याणाचे मुख्य साधन मानले आहे. कृष्ण म्हणतो की मनुष्याचे ध्येय हे त्याचे कार्य करत राहणे आहे, त्याने कधीही नशिबावर अवलंबून राहू नये. भगवान श्रीकृष्ण गीतेत म्हणतात की, काळ कधीच सारखा राहत नाही. इतर लोकांवर वाईट वेळ आणण्यासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीला त्याच दिवशी वाईट काळातून जावे लागते. श्री कृष्ण सांगतात की, कोणासोबत चालल्याने तुम्ही तुमचे ध्येय किंवा आंतरिक आनंद मिळवू शकत नाही, म्हणून काम करत राहण्यासाठी तुम्ही नेहमी एकटेच चालले पाहिजे. निर्भयपणे एकटे फिरताना तुमचे काम करत राहा.

# नांदिवसे ग्रामपंचायत कार्यालय व विविध विकास कामे ग्रामस्थांच्या उपस्थितीत आ. शेखर निकम यांच्या हस्ते उत्साहात संपन्न

## सुंदर,सुसज्ज व सोईसुविधेने नटलेली ग्रामपंचायत म्हणजे गाव विकासाचा मजबुत पाया – आ. शेखर निकम

चिपळूण/ प्रतिनिधी: (विलास गुरव) चिपळूण–संगमेश्वर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांच्या प्रयत्नातून नांदिवसे ग्रामपंचायत कार्यालय इमारत व विविध विकास कामे भूमीपुजन ग्रामस्थांच्या उपस्थितीत आमदार शेखरजी निकम यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



अनेक वर्ष ग्रामपंचायत इमारत सुसज्ञ व मोठी व्हावी असे सर्वच ग्रामस्थांचे स्वप्न होते.ग्रामपंचायत चालवताना जागा कमी असल्याने कार्यालयीन कामे करणे खूप अडचणीचे ठरत होते.रस्त्यांची कामे होणे सुद्धा अत्यंत गरजेचे होते.ग्रामस्थांच्या या मागणीचा व अडचणी,गरज लक्षात घेता नूतन ग्रामपंचायत इमारत मंजूर केल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार श्शेखरजी निकम यांचे आभार मानले यावेळी आमदार शेखर निकम यांनी मार्गदर्शन करताना आनंद व्यक्त केला व झालेल्या विकास कामे व मंजूर झालेल्या विकास कामाचा सविस्तर आढावा घेतला तसेच उर्वरीत विकास कामांची माहिती घेतली.यावेळी श्री.प्रकाश शिंदे यांनी सूत्रसंचालन करताना सांगितले कि या आदी जे कोणाला जमलं नाही असा विकास आमदार महोदयांनी केला आहे.सरपंच सौ.सायली शिंदे यांनी आमदार महोदय यांचे आभार मानले कारण त्यांच्या माध्यमातून गावात होत असलेला विकास अविस्मरणीय आहे. यावेळी गट विकास अधिकारी उमा पाटील,दिलीप चव्हाण,घाग साहेब,केळस्कर साहेब,सरपंच सायली शिंदे,उपसरपंच संतोष शिंदे,नारायण सकपाळ,शशिकांत शिंदे,जयंतराव शिंदे,प्रकाश शिंदे,अभिनंदन शिंदे,रोहिणी देवरुखकर,विजया पालांडे,नितीन शिंदे,नीता पडयाळ,नरसिंगराव शिंदे,तुकाराम गायकवाड,भरत अण्णा,रमेश दादा,सदाशिव जंगम,चंद्रकांत सुर्वे,बाबा शिंदे,अशोक शिंदे,राजाभाऊ,राजेश जाधव,गायकवाड,सर्व जाधव परिवार,सुनिल शिंदे,पोलीस पाटील,वसंत शिंदे,वसंत जाधव,माजी सरपंच अश्विनी शिंदे,नितीन पड्याल,अनिकेत शिंदे,अंगणवाडी सेविका,मदतनीस,आरोग्य सेविका व सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

# खैरे साहेब, यंदा रात्री १ वाजेपर्यंत नाचा!



छत्रपती संभाजीनगर : खैरे साहेब, या टायमाला तुम्ही बिनधास्त राहा, रात्री १२ काय १ वाजेपर्यंत नाचा. मी कमिश्नर साहेबांना सांगतो कानाडोळा करायला. अरे सरकार कोणाचं आहे, आणि हे संजय शिरसाट बोलतोय, काही दम आहे की नाही, असे म्हणत आमदार संजय शिरसाट यांनी गणेशोत्सवाची १२ वाजेपर्यंत वेळ वाढवून देण्याची मागणी करणा–या माजी खासदार चंद्रकांत खैरे यांना चांगल्याच कोपरखळ्या मारल्या.

भाषणाच्या शेवटी देखील, मी गणरायाकडे तुमच्या उज्ज्वल भवितव्यासाठी प्रार्थना करतो, असे म्हणत राजकीय शेरेबाजी करायलाही शिरसाट विसरले नाहीत.

गणेशोत्सवास शनिवारपासून प्रारंभ होत आहे. या पार्श्वभूमीवर पोलिस विभागातर्फे बोलावलेल्या समन्वय बैठकीला आ. संजय शिरसाट, प्रदीप जैस्वाल, माजी खासदार चंद्रकांत खैरे, पोलिस आयुक्त प्रवीण पवार, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा प्रशासक जी. श्रीकांत यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत गणेश मंडळांच्या पदाधिका–यांनी विविध मागण्या मांडल्या. त्याचवेळी शिरसाट व खैरे यांच्या भाषणातील राजकीय शेरेबाजी व कोपरखळ्यांनी मात्र बैठकीत एकच हास्यकल्लोळ उडाला.

‘सीनिअर सिटिझन’ कोण ? शिरसाट यांचा टोला ९ मिनिटांच्या भाषणामध्ये शिरसाट यांनी तीन वेळा खैरेंना पाहत मिश्किल टिप्पणी केली. शिवाय, इतरांच्या भाषणादरम्यान दहा ते पंधरा मिनिटे गुफ्तगू देखील केले. खैरेंपासून काही अंतरावर बसलेल्या पृथ्वीराज पवार यांना उद्देशून बोलताना शिरसाट म्हणाले की, तुम्ही आता ‘ओल्ड’ झाला आहात. सीनिअर सिटिझनने आता नव्यांना संधी द्यायला हवी.

# आगामी विधानसभेत महाविकास आघाडी व महायुती निवडणुकीत बंडखोरी होण्याची शक्यता

महाविकास आघाडी व महायुती धर्म पाळणार का?
महायुतीच्या बाबतीतही तीच परिस्थिती असून भारतीय जनता पक्षाने आमदार भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली कमिटी व बुथ स्तरापर्यंत टीम तयार करणे त्यासाठी गावोगावी बैठका घेतल्या जात आहेत. महायुतीतील शिवसेना (अजित पवार) गट व शिवसेना (शिंदे) गट आहे.
महाविकास आघाडीच्या बाबतीमध्ये तीच परिस्थिती असून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाने माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली बुथ बैठका चालू आहेत. महाविकास आघाडीतील काँग्रेस व शिवसेना (उबाठा) गट आहेत.



किनवट/शेख शौकत :–किनवट विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागण्याच्या मार्गावर असताना महाविकास आघाडी व महायुती तिकिटासाठी इच्छुकांच्या संख्येत मागील विधानसभा निवडणुकीप्रमाणे वाढ होताना दिसत आहे. मात्र मागील निवडणुकीत महायुतीतील मित्र पक्ष शिवसंग्रमा पक्षाला जागा सोडल्याने आता उमेदवार भाजपचा की शिवसंग्राम पक्षाचा राहणार, असा प्रश्न पुढे आला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महायुती व महाविकास आघाडी कडून भल्या मोठ्या इच्छुकांनी मुलाखती दिल्या; पण ऐनवेळी सतत पाच विधानसभा निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकाची मते घेऊन पराभूत होणाऱ्या आताचे आमदार भीमराव केराम यांना स्व. विनायक मेटे यांच्या शिवसंग्राम पक्षाची उमेदवारी बहाल करण्यात आली होती. यावेळी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षात अनेक जण इच्छुक असून त्या दृष्टीने मतदारसंघात कामाला लागल्याचे दिसून येत आहे. आता ही उमेदवारी परत स्व. विनायकराव मेटे असो की भारतीय जनता पक्ष असो दोन्हीपैकी कोणत्याही पक्षाला उमेदवारी मिळणार असलेतरी कार्यकर्त्यांतमध्ये खुशी व उत्साहात चर्चा चालू आहे. आधी दिवाळीपूर्वी विधानसभेच्या निवडणुका होतील अशा निवडणूक हालचाली सुरू झाल्या होत्या, ज्या त्या पक्षाने निवडणुकीची तयारी आपापल्या परीने चालवली होती. आता दिवाळीनंतर विधानसभेच्या निवडणुका होणार असल्याचे संकेत मिळाल्याने गाव भेटीसाठी इच्छुकांना वेळ मिळणार आहे. महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गावांत बुथ कमिटी स्थापन करण्यात भर दिला आहे. संघटन मजबूत करण्यासाठी महिला संघटन वाढविण्यावर भर दिला आहे. महाविकास आघाडीतील काँग्रेस व शिवसेना (उबाठा) या पक्षाच्या विधानसभा निवडणूक हालचाली नसल्याने ते आघाडीचा धर्म पाळतील असेच काहीसे तूर्तास चित्र आहे. वंचित बहुजन आघाडी, माकप व इतर पक्ष आणि अपक्ष निवडणुकीत ताकदीने उतरतील असे बोलले जात आहे.

# धर्मदाय रुग्णालय आणि महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत

## रुग्णालयांमार्फत ग्रामीण भागात विनामुल्य आरोग्य शिबिरांचे आयोजन

लातूर :– जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालय आणि महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत असलेल्या रुग्णालयांमार्फत जिल्ह्यात सप्टेंबर, २०२४ व ऑक्टोबर, २०२४ मध्ये शासनाच्या धोरणानुसार सामुदायिक आरोग्य शिबिरे विनामुल्य राबविण्यात येत आहेत. ६ सप्टेंबर, २०२४ रोजी लातूर शहरातील विवेकानंद हॉस्पिटलच्यावतीने लातूर तालुक्यातील काटगाव येथे, नेत्र प्रतिष्ठानच्यावतीने औसा तालुक्यातील नागरसोगा येथे, लातूर येथील सदासुख हॉस्पिटलच्यावतीने मातोळा येथे, लातूर येथील विवेकानंद हॉस्पिटलच्यावतीने लोदगा येथे सामुदायिक आरोग्य शिबीर होईल. ८ सप्टेंबर २०२४ रोजी लातूर शहरातील भटड हॉस्पिटल आणि सह्याद्री मल्टीस्पेशालिटीच्यावतीने औसा तालुक्यातील बेलकुंदा येथे शिबीर होईल. ९ सप्टेंबर २०२४ रोजी एमआयटी हॉस्पिटलच्यावतीने लातूर तालुक्यातील जवळा, विवेकानंद हॉस्पिटलच्यावतीने लातूर तालुक्यातील कामखेडा येथे शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. १० सप्टेंबर २०२४ रोजी उदयगिरी लॉयन्स हॉस्पिटलच्यावतीने निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे, एमआयटी हॉस्पिटलच्यावतीने निलंगा तालुक्यातील गातेगाव येथे, अल्फा सुपर स्पेशालिटीच्यावतीनेऔसा तालुक्यातील लिंबाळा येथे, ११ सप्टेंबर २०२४ रोजी उदयगिरी लायन्स हॉस्पिटलच्यावतीने निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथे, देशपांडे हॉस्पिटलच्यावतीने अंबुलगा यथे, सह्याद्री मल्टीस्पेशालिटीच्यावतीने नागरसोगा येथे शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. १२ सप्टेंबर रोजी उदयगिरी लायन्स हॉस्पिटलच्यावतीने उदगीर येथे, एमआयटी हॉस्पिटलच्यावतीने लातूर तालुक्यातील सामनगाव येथे, आयकॉन हॉस्पिटलच्यावतीने औसा तालुक्यातील फत्तेपूर येथे आरोग्य शिबीर होईल. १३ सप्टेंबर रोजी भटड हॉस्पिटलच्यावतीने औसा तालुक्यातील नागरसोगा येथे, नेत्र हॉस्पिटलच्यावतीने औसा तालुक्यातील वानवाडा येथे आरोग्य तपासणी होईल. १४ सप्टेंबर रोजी उदयगिरी लायन्स हॉस्पिटलच्यावतीने निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी, एमआयटी हॉस्पिटलच्यावतीने लातूर तालुक्यातील तांदूळवाडी येथे, नेत्र हॉस्पिटलच्यावतीने औसा तालुक्यातील बोरफळ येथे, सह्याद्री मल्टीस्पेशालिटीच्यावतीने तांबरवाडी येथे आरोग्य तपासणी केली जाणार आहे. १५ सप्टेंबर रोजी भटड हॉस्पिटलच्यावतीने बोरफळ येथे, एललाले हॉस्पिटलच्यावतीने टेंभी येथे, गायत्री हॉस्पिटलच्यावतीने बुधोडा येथे आणि कृष्णा हॉस्पिटलच्यावतीने लामजना येथे, सह्याद्री मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्यावतीने बोरफळ येथे आणि विवेकानंद हॉस्पिटलच्यावतीने उबुरगा येथे आरोग्य तपासणी शिबीर आयोजित केले जाईल, असे लातूरचे धर्मादाय उपायुक्त यांनी कळविले आहे.

# आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच औषध आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने ६३ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी : आपण सर्वांना ज्ञात आहेच की, १ सप्टेंबर १९५१ ला मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीच्या कोनशिला समारंभ प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संदेश दिला होता की, आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच औषध आहे. तसेच वर्तमानात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण :२०२० ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. म्हणून संदर्भीय विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त सद्यस्थितीवर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन ( आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६३ व्या वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे १ सप्टेंबर २०२४ ला मिलिंद मल्टीपर्पज हायस्कूल, नागसेनवन, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. अभय टाकसाळ म्हणाले की, आरक्षण ही दारिद्र्य निर्मूलनाची संकल्पना नाही. तसेच केवळ आरक्षणाने सर्व समस्या सुटतील असेही नाही. निष्पक्ष वैज्ञानिक विचारांची संदर्भासहित मांडणी करताना आपणास जबाबदारी स्विकार करावी लागेल. आपण भारताचे संविधान स्वतः प्रत समर्पित केले आहे. पहिलीला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ २० ते २१ टक्केच विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचतात. शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. स्वतंत्र भारतात सरकार नवीन शाळा उघडताना दिसत नाही मात्र आहेत त्या बंद करण्याच्या मार्गावर असल्याचे ऐकण्यात येत आहे. गरिबांनी शिकू नये म्हणून अभ्यासक्रमातच सीबीएसई व एसबीएसई असा भेदभाव करण्यात आला आहे. तरिही गरीब व्यक्ती पोटाला चिमटा घेऊन मुलांना खाजगी शाळेत पाठवितात. देशात जन्माला आलेली बालके ही देशाची संपत्ती आहे. परंतु शिक्षणा अभावी ही संपत्ती रस्त्यावर आहे. यावर भाष्य करताना अमर्त्य सेन म्हणतात की, राजकीय इच्छा शक्ती अभावी त्यांना शिक्षण नाकारले आहे. ज्यामुळे बेरोजगारांची फौज आत्महत्या कडे वळत असल्याने शेतक–यांपेक्षा बेरोजगारांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत. म्हणूनच महात्मा फुल्यांनी मोफत व शक्तीच्या शिक्षणाची हंटर कमिशन समोर मागणी केली होती. वेळोवेळी कायद्यात दुरुस्त्या करून सरकार या जबाबदारीतून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत असताना ही जबाबदारी पालकांवर सोपविण्याचा प्रयत्न करीत आहे. काँग्रेस व भाजपचे आर्थिक धोरणे ही जवळपास सारखीच आहेत. त्यात एनईपी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे एक कळसच आहे. आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेण्यात कमी पडलो आहोत हे आता मान्य केलेच पाहिजे.

यांप्रसंगी डॉ. सचिन बनसोडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास शासनकर्ती जमात व्हायला सांगितले होते आपण भाषण कर्ती जमात निर्माण केली. आपण ब्राह्मणांच्या बरोबरीने शिक्षण घेऊ लागलो, सुटा बुटात राहू लागलो हे त्यांना सहन होत नाही. १३ टक्क्यात एससी च्या ५९ जाती आहेत, ज्या केवळ लाभासाठी पुढे येतात आंदोलनासाठी नव्हे! महारा सारखी एखाद्या जातीच्या बळावर आंदोलन चालत असते. म्हणून आंदोलनाची वाताहात झालेली आहे. बॅलन्स आफ पावर मध्ये पासंगालाही उपयोगात येऊ शकलो नाही. करिता झोपलेल्या ओबीसींना जागे करावे लागेल. जेणेकरून ५४ टक्के ओबीसींना २७ टक्के का? याचा ते जॉब विचारू शकतील. के जी टू पी जी आणि पी जी टू पीएचडी पर्यंतच्या शिक्षणासाठी आपण अग्रेसर असले पाहिजे. एनई पी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे काँग्रेसची पॉलिसी ही बी जे पी पुढे रेटत आहे. या बदलात चार वर्षीय पदवीधर मध्ये प्रमाणपत्र, पदविका, पदवी आणि बहुशाखीय पदवी यातील बहुशाखीय मध्ये खरी गोम आहे. जग स्पेशलायझेशन कडे जात असताना आपण कुणीकडे? खाजगी शिक्षण संस्थांच्या विस्तारीकरणात शासकीय संस्था लुप्त होत आहेत. तरीही जगाची पुनर्रचना करणारे मूल्याधिष्ठित शिक्षण दिले पाहिजे.

प्रकाश तुपे म्हणाले की, एन ई पी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे एक प्रतिक्रांतीचे पाऊल आहे. जाती आधारित व्यावसायिक प्रशिक्षण देणे हे चातुर्वर्ण्यासह जातीव्यवस्था बळकट करण्याचे धोरण आहे. या धोरणाच्या अंमलबजावणी साठी काँग्रेसने पहिला, दुसरा व तिसरा तर भाजपाने चौथा व पाचवा गिअर टाकला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मौलाना अबूल कलाम आझाद यांना मुस्लिम आरक्षणावर चर्चेसाठी बोलाविले होते. मात्र ते नेहरूंच्या दबावामुळे उपस्थित राहू शकले नव्हते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते बाळासाहेब गरूड म्हणाले की, एनईपी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीने भारताला सुपर पावर बनविणे अपेक्षित असले तरी त्या अनुषंगाने तात्विक मांडणी पहायला मिळत नाही. गुणवत्तापूर्ण उत्कृष्ट शिक्षणाचा अभाव आहे. धर्मनिरपेक्षतेचे धिंडवडे काढले जात आहेत. सशक्तीकरणाच्या नावांवर खाजगी भांडवलदारांनी शाळा विकत घ्यायचे आहेत. इस्रोचे मंगळयान अवकाशात पाठविताना शास्त्रज्ञ पुजा करतात तर राफेल झेपावताना संरक्षण मंत्री लिंबू मिरची लावतात अशावेळी वैज्ञानिक दृष्टिकोन कुठे गहाण ठेवला जात असेल? अशाप्रकारे जैसे राजा वैसी प्रजाजन अशी पायाभरणी झाल्यास जागतिक महासत्तेचे स्वप्न कसे साकार होईल? करिता या विरोधात एकजुटीने उभे राहिले पाहिजे.



कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. ८ जुलै १९४५ ला स्थापन केलेल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटी अंतर्गत १९ जून १९५० ला औरंगाबाद येथील नागसेनवनात मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली होती. त्या काळात एक कोटी साठ लाख लोकसंख्येसाठी हैदराबाद संस्थानात १७ महाविद्यालये होती तर ३ कोटी २३ लाख लोकसंख्येच्या मुंबई प्रांतात ९० महाविद्यालये होती, ही विषमता दूर करण्यासाठी औरंगाबाद येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिलिंद महाविद्यालय स्थापन केले होते. ज्या महाविद्यालयातून आधुनिक भारताच्या जडणघडणीसाठी आवश्यक सामाजिक लोकशाहीच्या स्थापनेसाठी विद्वत्तापूर्ण व चारित्र्य संपन्न विद्यार्थी निर्माण व्हावे, अशी अपेक्षा होती. परंतु तसे न झाल्याने मानवी चारित्र्यात न्यूनता पहायला मिळत असल्याने शील व सौजन्य नसेल तर तो माणूस हिंस्र पशूपेक्षाही क्रुर व भितीप्रद समजण्यात यावा असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, त्याची प्रचिती येत आहे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १ सप्टेंबर १९५१ ला भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते मिलिंद महाविद्यालयाच्या इमारतीची कोनशिला बसविण्यात आली होती. त्या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हेच औषध आहे. तसेच वर्तमानात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाल्याने आपल्या शैक्षणिक अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. करिता सदरील विषयावर चर्चा आयोजित केली आहे. भारताचे संविधानाच्या अनुषंगाने बोलताना केवळ संविधान असा एकेरी उल्लेख करने हे भारताचे संविधानातील कलम ३९३ चे उल्लंघन आहे. त्या कलमानुसार भारतापासून संविधान या शब्दाला वेगळे करण्याचा आपणास अधिकार नाही म्हणून तर यासाठी भारताचे संविधानात कलम ३९३ ची स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. रोजगाराभिमुख शिक्षण न दिल्याने शिक्षित, उच्च शिक्षित वा अती उच्च शिक्षित बेरोजगार होऊ शकतो. परंतु सुशिक्षित व्यक्ती बेरोजगार होऊ शकतो? अशी मांडणी करणारे शैक्षणिक व्यवस्थेचे कसे अवमूल्यन करीत आहेत? याची शहानिशा केली पाहिजे. देशात सर्वत्र एक देश, एक शिक्षण व एक अभ्यासक्रम राबविला पाहिजे. यापूर्वी आंबेडकरांनी व्यवस्थेला काँग्रेस व गांधींनी अस्पृश्यांसाठी काय केले आहे? असा ग्रंथ रुपाने प्रश्न विचारला होता. आपण आता काँग्रेस व भाजपासह त्यांच्या आधाडीतील सहयोगी पक्षांनी या देशातील वंचित मूलनिवासी बहुजन समाजासाठी काय केले आहे? असा प्रश्न विचारला पाहिजे. करिता आज आपण संदर्भीय विषयावर चर्चा आयोजित केली आहे.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे तर प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला बाळासाहेब गरूड, प्रकाश तुपे, केशव कांगणे, शिवराय गरूड, डॉ. व्ही. एच. कांबळे, जी. एस. कांबळे, डी. ईश्वरलाल, प्रा. रफीक शेख, प्रा. तेजस कांबळे, एड. अभय टाकसाळ, तुकाराम थोरात, एस. ए. कानडे, एस. ओ. इंगळे, डॉ. सुरेश मादळे, भिमराज बोर्डे, सुभाष वानखेडे, राहुल मेश्राम, संकेत चव्हाण, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे अमित खिल्लारे यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE